# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२ २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

तार - EDUTECH E-mail : desk2a@dte.org.in Internet :http/www.dte.org.in


***<u>अधिसूचना</u>***

क्रमांक : २अ/एडीएम/प्रथम वर्ष-औनिमशा/२००७/१७५९

दिनांक : **२७ ऑगस्ट २००७**

**विषय :- शैक्षणिक वर्ष २००७-२००८ मधील प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी अंतिम दिनांक (Cut Off date) जाहिर करण्याबाबत**

शैक्षणिक वर्ष २००७-२००८ मधील प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया संपुष्टात आलेली असून त्यानंतर खाजगी विनाअनुदानित संस्थांमध्ये रिक्त राहिलेल्या प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या जागांवर प्रवेश घेण्यासाठी किंवा उमेदवारांनी घेतलेले प्रवेश रद्द करण्याबाबतच्या कार्यवाहीसाठी **शैक्षणिक वर्ष २००७-२००८ मधील प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमासंबंधी दि.२४ ऑगस्ट २००७ हा अंतिम दिनांक (Cut Off date) जाहिर करण्यात आला होता, तथापि प्रथम वर्ष वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाची प्रवेशप्रक्रीयेची दुसरी प्रवेश फेरी दिनांक २५ ऑगस्ट २००७ रोजी झाल्यामुळे प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या जागा रिक्त झाल्या आहेत उपरोक्त वस्तुस्थिती पाहता प्रवेशाचा अंतिम दिनांक ३१ ऑगस्ट २००७ पर्यंत वाढविण्यात आलेला आहे. सदर दिनांकापर्यंत सर्व शासकीय, शासकीय अनुदानीत, विद्यापीठ विभाग व विनाअनुदानीत संस्थांमध्ये संस्थांस्तरावर गुणवत्तेनुसार प्रवेशप्रक्रीया राबविण्यात यावी.**

उपरोक्त अंतिम तारखेनंतर प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमास उमेदवारांनी घेतलेले प्रवेश ग्राह्य धरले जाणार नाहीत.

तरी सर्व संबंधित संस्था आणि विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी.

**( प्रा. न. बा. पासलकर )**
संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई